भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ४५८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २०/०६/२०१७

**१) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन थापड बुक्यांनी छातीवर मारुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक १९/०६/२०१७ चे ०७.०० वा. दर. यातील फिर्यादी विलास भिमराव रामटेके वय ४० वर्ष, रा. कोसरा हा कोसरा गावाचे गेटजवळ उभा असतांना आरोपी हा फिर्यादीच्या जवळ येवुन थांबला व तु गावात राजकारण करतोस 'तु ग्रामपंचायतचा मेंबर आहेस' का असे म्हणुन फिर्यादीचे कॉलर पकडुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन थापड बुक्यांनी छातीवर मारुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २९४,५०६,३२३ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**२) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन अश्लिल शिवीगाळ करुन थापडबुक्याने मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १९/०६/२०१७ चे ०७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी शिवशंकर दत्तक फंदी वय ४७ वर्ष, रा. कोसरा हा मोटार सायकल नी गावात जात असतांना आरोपीने आवाज दिला असता फिर्यादी हा मोटार सायकल उभी करतांना आरोपीने फिर्यादीस म्हटले की 'तु गावात राजकारण करतोस' यावरुन भांडण करुन अश्लिल शब्दात शिवीगळ करुन व थापडबुक्यांने नाकावर, तोडावर मारुन पुढे मारण्याची पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे अडयाळ येथे कलम २९४,५०६(ब),३२३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाखव पो. स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**३) अवैद्यरित्या ट्रकमध्ये जनावरे डांबुन कोंबुन भरुन निर्दयतेची वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १८/०६/२०१७ चे २२.०० वा. दरम्यान यातील आरोपी चालक व मालकाने संगनमत करुन आपले ताब्यातील ट्रक मध्ये एकुण १५ म्हशी किंमती अंदाजे ८५,०००/—रु. चे जनावरे डांबुन, कोंबुन भरुन त्यांना निर्दयतेची वागणुक देवुन कत्तली करीता अवैद्यरित्या वाहतुक करतांनी मिळुन आल्याने व आरापीने जनावरे म्हशी वाहतुकी बाबत कोणतेही डॉक्टरी व इतर कोणतेही कागदपत्र पेश न केल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोस्टे कारधा येथे कलम ११(ड)(ई) प्रा. नि.का सहकलम ५(अ) (१) प्रा. सं. का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो. स्टे. कारधा हे करीत आहेत.

**४) वैनगंगा नदीचे पाण्यात अनोळखी इसमाचे प्रेत मिळुन आले :—**

दिनांक १९/०६/२०१७ चे ०६.०० वा. दर. यातील मृतक एक अनोळखी इसम वय अंदाजे ३५ ते ४० वयोगटातील हा नग्न अवस्थेत वैनगंगा नदीचे पात्रातील पाण्यात मरण पावलेल्या स्थितीत मिळुन आल्याने फिर्यादी रामदास फत्तु बोन्द्रे वय ४५ वर्ष, नरसिंह टोला यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे करडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कन्हाके पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक १९/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०३ तीन सिटर वाहनांवरती १८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९९ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

20.6.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.